अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

रक्षाबंधनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 27 ऑगस्ट 2026 | वर्ष 12 वे | अंक 03 रा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# ब्रम्हपुरी नगर परिषदेच्या टेंडर प्रक्रियेत गडबड?

## चौकशीचे आदेश असतांना नव्याने निविदा; नगरसेवक मनोज भुपाल यांचे प्रशासनावर गंभीर आरोप

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी शहरातील विकासकामांच्या निविदांवरून (टेंडर) सध्या नगर परिषद प्रशासन चांगलेच अडचणीत आले आहे. रस्ता अनुदान निधी २०२५-२६ अंतर्गत शहरात विविध विकासकामे केली जाणार होती. पण ही कामे देताना मर्जीतील लोकांना फायदा पोहोचवण्यासाठी नियमांची पायमल्ली करण्यात आली, असा थेट आरोप नगरसेवक मनोज राजेश्वर भूपाल यांनी केला आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याचे स्पष्ट आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले असतानाच, प्रशासनाने घाईघाईने नव्याने निविदा प्रसिद्ध केल्याने संशयाचे भूत अधिकच गडद झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरुवातीला एकाच कामाचे छोटे छोटे तुकडे करून वेगवेगळ्या निविदा काढण्यात आल्या होत्या. आपल्या जवळच्या ठेकेदारांना सोयीचे पडावे म्हणूनच हा सगळा खेळ रचला गेल्याचा संशय व्यक्त होत आहे. पुढे याच कामांसाठी एकदम ५८ लाख रुपयांची नवीन निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. या संपूर्ण प्रकारात मोठी अनियमितता झाल्याचे लक्षात येताच नगरसेवक मनोज भूपाल यांनी थेट जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे निवेदन देऊन तक्रार नोंदवली. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने गंभीर दखल घेतली.

जिल्हाधिकारी कार्यालयाने (नगरपरिषद प्रशासन) २० ऑगस्ट २०२६ रोजी ब्रह्मपुरी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना एक पत्र पाठवले. निविदा प्रक्रियेत शासकीय नियमांचे पालन झाले आहे की नाही, याची सखोल चौकशी करून संपूर्ण कागदपत्रांसह वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे कडक निर्देश या पत्राद्वारे देण्यात आले. एकीकडे जिल्हाधिकाऱ्यांचे चौकशीचे पत्र नगर परिषदेत पोहोचते, आणि दुसरीकडे लगेचच प्रशासनाकडून नव्याने निविदा प्रक्रिया सुरू केली जाते. त्यामुळे 'चौकशी सुरू असताना नवी निविदा काढण्याची एवढी घाई का झाली?' असा संतप्त सवाल आता नागरिक आणि लोकप्रतिनिधी विचारत आहेत. नगर परिषद प्रशासन जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला गांभीर्याने घेत आहे की नाही, असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

या संदर्भात बोलताना नगरसेवक मनोज राजेश्वर भूपाल यांनी प्रशासकीय कारभारावर जोरदार ताशेरे ओढले. ते म्हणाले, 'जेव्हा जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः या

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## पेठवार्डातील एकाला भरमार बंदुकीसह अटक

ब्रम्हपुरीः

शहरातील पेठवार्ड परिसरात एका घरात बेकायदेशीरपणे अग्निशस्त्र (भरमार बंदूक) बाळगणाऱ्या एका ५६ वर्षीय व्यक्तीला ब्रम्हपुरी पोलिसांनी रंगेहात पकडलं आहे. २५ ऑगस्ट २०२६ रोजी केलेल्या या धडक कारवाईत पोलिसांनी सुमारे १० हजार रुपये किमतीची जुनी भरमार बंदूक जप्त केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज खडसे हे आपल्या सहकाऱ्यांसह (पो.हवा. मुकेश गजबे, पो.हवा. मिलिंद नैताम, पो.अं. स्वप्नील पळसपगार, पो.अं. इर्शाद खान आणि पो.अं. प्रवीण भिवगडे) गस्तीवर होते. अवैध जनावरांची वाहतूक, प्रोव्ही रेड आणि जुगार रेडच्या कामासाठी पथक खाजगी वाहनाने पेट्रोलींग करत असतानाच गुप्त बातमीदाराकडून एक खळबळजनक माहिती मिळाली. पेठवार्ड येथील रहिवासी रतनसिंग भुरानी हा आपल्या घरात बेकायदेशीरपणे अग्निशस्त्र बाळगून असल्याची पक्की खबर मिळताच, पथकाने तत्काळ पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले साहेबांना कळवून त्यांच्या आदेशानुसार कारवाईची पावले उचलली.

रेल्वे फाटक परिसराजवळ दोन स्वतंत्र पंचांना सोबत घेऊन पोलीस पथकाने थेट आरोपीच्या घरावर छापा टाकला. पोलिसांनी घरात प्रवेश करून पहिल्या खोलीतील बेडवर असलेल्या गादीची झडती घेतली असता, खाली लपवून ठेवलेली एक लाकडी-लोखंडी बनावटीची भरमार बंदूक मिळून आली. या बंदुकीवर '1853 ENFIELD' असे लिहिलेले असून, सोबत बारूद ठासण्यासाठी लागणारा ९५.५ सेमीचा लोखंडी रॉडही सापडला. अग्निशस्त्राबाबत परवाना विचारला असता आरोपीकडे कोणताही परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी घटनास्थळीच

(उर्वरित पान क्र. ६ वर)




## गजानन नगरीत धाडसी घरफोडी

### सोन्या-चांदीचा ऐवज लंपास

ब्रह्मपुरी/का.प्र.

कामानिमित्त घराला कुलूप लावून बाहेरगावी गेल्याचा गैरफायदा घेत चोरट्यांनी गजानन नगरी येथील एका घरात धाडसी घरफोडी करून सोन्या-चांदीचा ऐवज लंपास केल्याची घटना २२ ऑगस्ट २०२६ रोजी उघडकीस आली.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी लक्ष्मीबाई गोपाळ बोरकर (वय ७४ वर्ष, गजानन नगरी, ब्रह्मपुरी) या १८ ऑगस्ट २०२६ रोजी मुलीसह घराला व कंपाउंडला कुलूप लावून एसटी बसने कामानिमित्त बल्लारशा (जि. चंद्रपूर) येथे गेल्या होत्या. त्यानंतर २१ ऑगस्ट २०२६ रोजी त्या घरी परतल्या असता, त्यांना हॉलमध्ये प्रेससाठी ठेवलेले मुलाचे कपडे खाली पडलेले दिसले. बेडरूममध्ये जाऊन पाहिले असता दोन लोखंडी व एक लाकडी कपाटाचे दरवाजे उघडे होते आणि कपाटातील कपडे बेडवर व खोलीत अस्ताव्यस्त पडलेले दिसले. घरातील सामानाची पाहणी केली असता लाकडी कपाटात ठेवलेले ३,५०० रुपयांचे चांदीचे दोन जोड चाळ आणि ५,२०० रुपयांचे अर्धा ग्रॅम सोन्याचे बारीक मणी, असा एकूण ८,७०० रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लांबवल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

## संपादकीय...

# बहिणींची गुंज ऐकण्याची वेळ!

लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचे काम केवळ सत्ताधाऱ्यांवर टीका करणे एवढ्यापुरते मर्यादित नसते. सत्तेच्या राजकारणापलीकडे जाऊन समाजातील प्रश्नांना व्यासपीठ मिळवून देणे, नागरिकांच्या अनुभवांना सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आणणे आणि सरकारला त्या प्रश्नांची जाणीव करून देणे, हीदेखील विरोधी पक्षाची महत्त्वाची जबाबदारी आहे. पुण्यात काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'छात्रों की गुंज' या उपक्रमांतर्गत महिलांशी साधलेला संवाद या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

राखी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या कार्यक्रमाचे प्रतिकात्मक महत्त्वही दुर्लक्षित करता येणार नाही. 'बहिणींशी संवाद' हा विषय निवडून राहुल गांधी यांनी महिलांना केवळ राजकीय भाषण ऐकणाऱ्या श्रोत्या म्हणून न पाहता त्यांच्या अनुभवांना बोलते केले. व्यासपीठावर आलेल्या महिलांनी शिक्षण, रोजगार, सुरक्षितता, भेदभाव आणि सामाजिक बंधने यांसारख्या प्रश्नांवर मोकळेपणाने मते मांडली. राजकीय आरोप-प्रत्यारोपांपासून कार्यक्रम दूर ठेवण्याचा प्रयत्न झाला, ही बाब विशेषत्वाने नोंदवावी लागेल. भारतीय राजकारणात सध्या संवादापेक्षा संघर्षाला अधिक महत्त्व आले आहे. प्रत्येक प्रश्नाचे राजकीय ध्रुवीकरण करणे आणि प्रत्येक चर्चेला सत्ताधारी विरुद्ध विरोधक अशा चौकटीत बसविणे, ही सवय सर्वच पक्षांना लागली आहे. अशा वातावरणात एखादा राजकीय नेता स्वतःच्या पक्षीय भूमिकेच्या पलीकडे जाऊन नागरिकांचे अनुभव ऐकतो, ही बाब स्वागतार्ह आहे. अर्थात, अशा कार्यक्रमामागे राजकीय हेतू नाही, असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. कोणताही राजकीय उपक्रम पूर्णपणे राजकारणविरहित नसतो. मात्र, त्यातून उपस्थित होणारे प्रश्न महत्त्वाचे असतील, तर त्यांची चर्चा करण्याची संधी नाकारण्याचे कारण नाही.

राहुल गांधी यांनी या संवादाच्या निमित्ताने पुरुषप्रधान मानसिकतेवर केलेली टीका म्हणूनच अधिक व्यापक संदर्भात पाहावी लागेल. त्यांनी मनुस्मृतीचा संदर्भ दिला; परंतु महिलांवरील बंधने ही कोणत्याही एका ग्रंथाची किंवा एका धर्माची मक्तेदारी नाहीत. विविध समाजव्यवस्थांमध्ये परंपरा, रूढी, धार्मिक संकेत आणि कौटुंबिक संस्कार यांच्या माध्यमातून महिलांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालणाऱ्या प्रवृत्ती आढळतात. त्यामुळे प्रश्न एखाद्या विशिष्ट ग्रंथापुरता मर्यादित न ठेवता महिलांना दुय्यम मानणाऱ्या एकूण पुरुषप्रधान मानसिकतेचा आहे. महिलांना 'सुरक्षित' ठेवण्याच्या नावाखाली त्यांच्यावर निर्बंध लादणे आणि त्यांना निर्णयक्षम, स्वतंत्र नागरिक मानणे यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. मुलीने कुठे जावे, कोणते शिक्षण घ्यावे, कोणता व्यवसाय करावा, किती उशिरा बाहेर राहावे, कोणाशी विवाह करावा, अशा प्रश्नांवर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार कुटुंब किंवा समाजाने स्वतःकडे ठेवणे, ही मानसिकता बदलल्याशिवाय खरी समानता साध्य होणार नाही. महिलांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न हा महिलांचा एकट्याचा प्रश्न नसून लोकशाहीच्या गुणवत्तेचा प्रश्न आहे.

या पार्श्वभूमीवर सत्ताधाऱ्यांनी अशा संवादांकडे केवळ राजकीय आव्हान म्हणून पाहणे टाळले पाहिजे. विरोधी पक्षनेत्याने कोणता कार्यक्रम घेतला, त्यामागे कोणता राजकीय हेतू आहे, यावर चर्चा होऊ शकते; पण त्यापेक्षा महिलांनी नेमके काय सांगितले, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. पुण्यात उमटलेली 'बहिणींची गुंज' त्यामुळे एका कार्यक्रमापुरती मर्यादित राहता कामा नये. ती संसदेत, विधानसभेत, विद्यापीठांत, कार्यस्थळांवर आणि प्रशासनाच्या निर्णयप्रक्रियेत ऐकू आली पाहिजे. लोकशाहीत निवडणुका येतात आणि जातात; सत्ता बदलते, चेहरे बदलतात. मात्र, नागरिकांचे मूलभूत प्रश्न कायम राहू नयेत, याची काळजी घेणे हे राजकारणाचे खरे उद्दिष्ट असले पाहिजे. पुण्यात महिलांनी व्यक्त केलेल्या भावना या त्यामुळे केवळ राहुल गांधी यांच्या कार्यक्रमाची राजकीय उपलब्धी मानण्यापेक्षा समाजासमोर ठेवलेला आरसा म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. त्या आरशात दिसणारे वास्तव अस्वस्थ करणारे असेल, तर आरसा फोडण्याऐवजी चेहरा बदलण्याची वेळ आली आहे. 'बहिणींची गुंज' ऐकली गेली आहे; आता तिचे रूपांतर कृतीत करण्याची वेळ आहे.

# भूगोल विषय प्रत्येकाच्या जीवन संबंधाचा

## भूगोल विषय कार्यशाळेत अशोक भैया यांचे प्रतिपादन



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली आणि नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' अंतर्गत भूगोल विषयाच्या अभ्यासक्रमावर आधारित कार्यशाळा पार पडली. यात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, बदलत्या अध्यापन पद्धती व प्राध्यापक, विद्यार्थ्यांसमोरील आव्हानांवर विचारमंथन करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्घाटन नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव संस्थेचे सचिव अशोक भैया यांनी केले. यावेळी त्यांनी 'भूगोल विभाग आमच्या महाविद्यालयात समृद्ध विभाग असून येथून हजारो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले आहे. हा विषय प्रत्येकाच्या जीवनसंबंधाचा आहे, त्यामुळे तो प्रत्येकाच्या आवडीचा असावा,' असे विचार मांडले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ.सुभाष शेकोकर तर प्रमुख अतिथी म्हणून जनता महाविद्यालय, चंद्रपूरचे भूगोल विभागप्रमुख डॉ.योगेश दूधपचारे तसेच आयोजक भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.राजेंद्रकुमार डांगे उपस्थित होते.

नवीन शैक्षणिक धोरण २०२० प्रत्यक्ष अंमलात आले असताना भूगोल विषयाच्या अध्यापनामध्ये झालेले बदल, प्राध्यापक व विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने, अभ्यासक्रमाची रचना, विद्यार्थ्यांना अपेक्षित अध्ययन निष्पत्ती आणि आधुनिक अध्यापन पद्धतीवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. गोंडवाना विद्यापीठाच्या सत्र पाचच्या तांत्रिक सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. राजेंद्रकुमार डांगे होते तर डॉ.योगेश दूधपचारे यांनी स्पीकर म्हणून मार्गदर्शन केले. सत्र सहाच्या तांत्रिक सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. हरीश लांजेवार होते तर डॉ. रवी रणदिवेंनी स्पीकर म्हणून महत्त्वपूर्ण योगदान दिले. या सत्रांमध्ये नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी, अध्यापनातील नावीन्य आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेचे संचालन डॉ. आशिष साखरकर व डॉ. प्रमोद वसाके यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. विजय गोरडेंनी मानले. यावेळी विविध महाविद्यालयांतील भूगोल विषयाचे प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंजुषा भागडकर यांच्या पुढाकाराने चौगानमध्ये शिक्षणाचा नवा अध्याय

## लहानग्यांपासून ते तरूणांपर्यंत सर्वांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



ब्रम्हपुरी/का.प्र.

गावात कसा आमूलाग्र बदल घडवता येतो, याचं एक अतिशय सुंदर आणि जिवंत उदाहरण नुकतंच चौगान गावात पाहायला मिळालं. येथील प्रसिद्ध उद्योजक विजय भागडकर यांच्या पत्नी आणि सामाजिक कार्यकर्त्या मंजुषाताई भागडकर यांनी शिक्षणाचा एक असा उपक्रम राबवला, ज्याची चर्चा आता संपूर्ण परिसरात अतिशय कौतुकाने होत आहे. गुरुवारी, २० ऑगस्ट २०२६ रोजी चौगान गावात पार पडलेला हा कार्यक्रम केवळ वस्तू वाटपाचा कार्यक्रम नव्हता; तर ती गावातील मुलांच्या आणि तरुणांच्या भविष्याला दिलेली एक मोलाची दिशा होती. लहानग्यांच्या हातातल्या पाण्याच्या बाटलीपासून ते स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणांच्या हातातल्या पुस्तकांपर्यंत... मंजुषाताईंनी प्रत्येकाच्या गरजांचा मनापासून विचार केला होता. भागडकर कुटुंबीयांनी सामाजिक भान जोपासत ३० हजाराचे शालेय साहित्य व ४० हजारांचे स्पर्धा परीक्षांची पुस्तके असा एकुण ७० हजार रुपयांचे साहित्य वितरण केले आहे.

या कार्यक्रमाला माजी सरपंच तथा प्रशासक उमेश धोटे, माजी उपसरपंच अंकुश मातेरे, सामाजिक कार्यकर्ते विजय भागडकर आणि तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मधुकर राऊत, सुरज शिवणकर, सुभाष नन्नावरे, विनोद बुराडे, मधुकर तोंडरे, गणेश मलोडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यांसोबतच मंजुषाताई विजय भागडकर, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अंगणवाडी कार्यकर्त्या आणि मोठ्या संख्येने गावकरी हजर होते.

### विनोदिनी

एक महिला का तलाक होने के अगले हफ्ते ही कोर्ट में फिर से याचिका दायर करने के लिए वह अपने वकिल के पास गई...

महिला : मुझे मेरे पूर्व पति से फिर से शादी करनी है।

वकील : अभी आठ दिन पहले ही तो आपका तलाक़ करवाया है। फिर क्यों....!!

महिलाः वो तलाक़ के बाद बहुत खुश दिख रहे हैं और मैं ये बर्दाश्त नहीं कर सकती...!!!

# मानसिक शोषण थांबविण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाची रुजवणूक आवश्यक

## अखिल भारतीय अंधश्रध्दा निर्मूलन समितीची व्यक्तिमत्व विकास व वैज्ञानिक दृष्टिकोन कार्यशाळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

अंधश्रद्धा ही केवळ चुकीची धारणा नसून ती माणसाच्या विवेकबुद्धीवर, विचारशक्तीवर आणि सामाजिक प्रगतीवर घाला घालणारी भयावह समस्या आहे. बुवा-बाबा, तंत्र-मंत्र, जादूटोणा, करणी आणि तथाकथित चमत्कारांच्या नावाखाली सामान्य नागरिकांची होणारी फसवणूक व मानसिक शोषण थांबविण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाची रुजवणूक अत्यंत आवश्यक असल्याचा संदेश अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शाखा ब्रम्हपुरीच्या वतीने आयोजित व्यक्तिमत्त्व विकास व वैज्ञानिक दृष्टिकोन कार्यशाळेत देण्यात



आला. ब्रम्हपुरी पब्लिक स्कूल, येथे आयोजित या कार्यशाळेला विद्यार्थी व युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य युवा संघटक पंकज वंजारे यांनी अंधश्रद्धेच्या विविध स्वरूपांवर सखोल मार्गदर्शन केले. अंधश्रद्धा ही केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नसून तिच्या नावाखाली फसवणूक, आर्थिक शोषण, मानसिक गुलामगिरी आणि सामाजिक नुकसान घडवून आणले जाऊ शकते, याकडे त्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. तंत्र-मंत्र, चमत्कार किंवा इतर अंधश्रद्धाजन्य प्रकारांच्या माध्यमातून कोणी समाजाची दिशाभूल अथवा फसवणूक करीत असेल, तर त्याविरोधात कायदेशीर मार्गाने आवाज उठविता येतो, याबाबत माहिती त्यांनी दिली. अंनिस, चंद्रपूरचे जिल्हा संघटक अनिल दाहागावकर तसेच जिल्हा सचिव धनंजय तावडे यांनीही मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या दोन्ही सत्रांमध्ये विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. पहिल्या सत्राचे उद्घाटक प्रा. देवेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. खिजेंद्र गेडाम होते, भाऊराव राऊत सर आणि प्रा. शिरीन खान यांची प्रमुख उपस्थिती होती. दुसऱ्या सत्राचे उद्घाटन प्राचार्या रीमा कांबळे यांच्या हस्ते झाले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी आरती भेंडारकर होत्या, तर डॉ. योगेश बनवाडे, प्रा. बालाजी दमकोंडवार सर आणि शशिकांत बांबोळे सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समिती युवा शाखा, ब्रम्हपुरीचे राहुल सोनटक्के, सुमित खोजरे, रक्षित रामटेके, गौरव भेंडारकर, आदित्य बोरकर, राहुल भोयर, राजेश माटे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गौरव भेंडारकर यांनी केले, सूत्रसंचालन सुमेध वालदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आदित्य बोरकर यांनी केले. ह्या कार्यक्रमाला अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती ब्रम्हपुरी चे तालुका अध्यक्ष डॉ. खिजेंद्र गेडाम, बालाजी दमकोंडवार, शशिकांत बांबोळे यांच्या मार्गदर्शन लाभले.

अंधश्रद्धेच्या विरोधातील लढा हा केवळ एखाद्या व्यक्तीविरोधातील संघर्ष नसून तो अज्ञान, भीती, शोषण आणि मानसिक गुलामगिरीविरोधातील सामाजिक लढा आहे. या लढ्याला बळ देण्यासाठी नव्या पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजणे आवश्यक आहे. त्यामुळेच या कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हीच कार्यक्रमाची खरी फलश्रुती असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले.

●●●●●●●

# विनोद झोडगे यांच्या वाढदिवशी मोफत आरोग्य तपासणी

ब्रह्मपुरी/का.प्र.

शेतकरी, कष्टकरी व कामगारांचे नेते विनोद झोडगे यांच्या वाढदिवसाचे औचित्य



साधून मौजा मुडझा येथे भव्य मोफत रोगनिदान व आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) आणि आस्था रुग्णालय, ब्रह्मपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरास परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आवळगाव, हळदा, बोडधा, कुडेसावली, मुडझा, बल्लारपूर, पद्मापूर, कोसंबी, आक्सापूर, पवनपार, बेलगाव, मुरपार, सायगाव, वांद्रा, डोरली, चिचगाव, बरडकिन्ही, आकापूर, करोली, खानाबाद यासह अन्य गावातील एकूण ३०५ नागरिकांनी आपली मोफत तपासणी व नोंदणी करून या सेवेचा लाभ घेतला.

या आरोग्य शिबिरात विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने रुग्णांची कसून तपासणी केली आणि आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला. डॉ. विवेक बागडे, डॉ. पंकज लाडके, डॉ. महेश चनाप, डॉ. सचिन गिन्हेपुंजे, डॉ. महेश कोपुलवार यांनी नागरिकांची तपासणी केली. याशिवाय शिबिरात भोयर मेडिकलतर्फे रुग्णांना औषधांवर १५ टक्क्यांपर्यंत विशेष सवलत देण्यात आली.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी अमोल मानापुरे,बंडू कोटगले, दुधराम भोयर, गीता कोटगले, देविदास हुलके, आनंदराव तलानडे, पांडुरंग राऊत, मुखर झोडगे, डॉ.बर्वे, बी डी उरकुडे, मंगरू ठाकरे, गोलू दर्वे, संतोष झोडगे, राहुल पांडव, शरद भानारकर, सुधाकर लोणारे, सुनील पाटील म्हशाखेत्री, चुनीलाल मोटघरे, परसराम ठाकरे, सदाशिव उंदिरवाडे यासह पक्षाचे कार्यकर्ते , आशा वर्कर, गावातील तरुण मंडळी व सामाजिक कार्यकर्ते आदींनी परिश्रम घेतले.

# होमिओपॅथिक डॉ. विलास गजपुरे यांचे निधन

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी आणि नागभीड परिसरातील वैद्यकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील एक अत्यंत परिचित अन् आदरणीय व्यक्तिमत्त्व, नामवंत होमिओपॅथिक डॉ. विलास गजपुरे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. सोमवार, २४ ऑगस्ट रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

डॉ. विलास गजपुरे हे केवळ वैद्यकीय सेवेपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी आपल्या मनमिळावू स्वभावाने आणि सामाजिक बांधिलकीतून नागरिकांच्या मनात हक्काचे स्थान निर्माण केले होते. ब्रम्हपुरी अर्बन बँकेचे माजी



उपाध्यक्ष व विद्यमान संचालक, सोनार समाजाचे माजी अध्यक्ष आणि होमिओपॅथी अकॅडेमी ब्रम्हपुरीचे अध्यक्ष अशा अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांनी अत्यंत कुशलतेने पार पाडल्या.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले असा मोठा परिवार आहे. डॉ. विलास गजपुरे यांच्या पार्थिवावर मंगळवार, २५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ब्रम्हपुरी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

✽✽✽✽✽✽✽

# शहरातील खड्डे बुजविण्याकरीता मुरूमाची रॉयल्टी द्या

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील विविध भागांतील रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असून वाहनचालक, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी मनोज भूपाल यांनी ब्रम्हपुरीचे तहसीलदार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

येत्या काळात गणेश उत्सव येणार आहे तेव्हा अनेक ठिकाणी मुरूम ची आवश्यकता भासणार आहे ते लक्षात घेऊन रॉयल्टी उपलब्ध करून देण्यात यावी. शहरातील विविध भागांमध्ये पडलेले खड्डे तातडीने बुजविण्यासाठी मुरूमाची आवश्यकता आहे. त्यामुळे शासनाच्या नियमानुसार उपलब्ध होणारा मुरूम नगर परिषदेला तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघाताची शक्यता वाढली असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने विलंब न करता कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. ‘नागरिकांची सुरक्षितता ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असून खड्ड्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लागणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक मुरूम उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा,’ अशी मागणी मनोज भूपाल यांनी केली.

✽✽✽✽✽✽✽

# 'मेट' कर्मचाऱ्यांच्या थकीत अन् नियमित मानधनाचा मार्ग शेवटी मोकळा



ब्रह्मपुरी/का.प्र.

वनहक्क कायद्याची योग्य अंमलबजावणी व्हावी यासाठी धडपडणाऱ्या ग्राम रोजगारा सेवकांसाठी (मेट) अखेर एक खूप मोठी आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात सामूहिक वनहक्क समिती अंतर्गत काम करणाऱ्या मेट कर्मचाऱ्यांच्या थकीत आणि नियमित मानधनाचा प्रश्न आता सुटला आहे. 'राधा ऑर्गनायझेशन' या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रशासनाने याबाबत थेट आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील शेकडो मेट कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण आहे. जिल्ह्याचे तहसीलदार आणि पंचायत समितीच्या सर्व गट विकास अधिकाऱ्यांना यासंदर्भातील स्पष्ट निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

काम असूनही मानधन वेळेवर न मिळणे किंवा नोंदणीत गोंधळ होणे, या तक्रारी आता दूर होणार आहेत. नवीन आदेशातील मुख्य बाबी मध्ये आता ग्रामपंचायत आणि CFR ग्रामसभा यांनी तयार केलेल्या मनुष्य दिवसांची गणना एकत्र न होता स्वतंत्रपणे केली जाईल. यामुळे कोणाचे किती काम झाले, याचा अचूक हिशोब राहील. स्वतंत्र गणनेच्या आधारेच मेट कर्मचाऱ्यांचे थकीत आणि नियमित मानधन थेट दिले जाईल. यात कोणतीही अडवणूक होणार नाही. ही पूर्ण प्रक्रिया ३० नोव्हेंबर २०२१ च्या शासन निर्णयानुसार आणि नागपूर येथील आयुक्तांनी दिलेल्या पत्रातील सूचनांनुसार पार पाडली जाईल.

ग्रामपंचायतीच्या कामात पारदर्शकता यावी आणि कर्मचाऱ्यांना त्यांचा हक्क वेळेवर मिळावा, यासाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे. कामाच्या नोंदणीत सुटसुटीतपणा आल्यामुळे मानधन मिळण्यात होणारा उशीर टळणार आहे. या यशाबद्दल जिल्ह्यातील सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभा आणि ग्राम रोजगार सेवकांनी राधा ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष डॉ. हरिदास तुपटे, संबंधित तहसीलदार आणि गट विकास अधिकाऱ्यांचे मनापासून आभार मानले आहेत. वनअधिकार कायदा २००६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राधा ऑर्गनायझेशनने यापुढेही असेच मोलाचे योगदान द्यावे आणि शासनाने त्यांना सोबत घेऊन ग्रामीण विकास साधावा, अशी आशाही व्यक्त करण्यात आली.

# ग्रामीण भागातील विद्युत डिपींची क्षमता वाढवा

## तनय देशकर यांची महावितरणला तातडीने कारवाई करण्याची मागणी

ब्रह्मपुरी/का.प्र.

ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये कमी क्षमतेच्या विद्युत वितरण पेट्या (डीपी) कार्यरत असल्याने नागरिक तसेच शेतकऱ्यांना वारंवार वीजपुरवठ्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वाढलेल्या वीज जोडण्या आणि विजेची वाढती मागणी यामुळे या डीपींवर अतिरिक्त भार पडत असून, वारंवार वीज खंडित होणे, कमी व्होल्टेजचा वीजपुरवठा होणे आणि डीपीमध्ये तांत्रिक बिघाड होणे अशा समस्या निर्माण होत आहेत.

या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष तनय देशकर यांनी महावितरणकडे पत्राद्वारे मागणी केली आहे. ग्रामीण भागातील कमी क्षमतेच्या डीपींची तातडीने पाहणी करून आवश्यकतेनुसार त्यांची क्षमता वाढवून कमी व्होल्टेजची समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.

ग्रामीण भागातील शेती मोठ्या प्रमाणात विद्युत पंपांवर अवलंबून आहे. मात्र कमी व्होल्टेजमुळे कृषी पंपांची कार्यक्षमता प्रभावित होते, पंपांमध्ये तांत्रिक बिघाड होण्याची शक्यता वाढते आणि शेतकऱ्यांच्या सिंचन व्यवस्थेवरही त्याचा परिणाम होतो. घरगुती ग्राहकांनाही कमी व्होल्टेज व वारंवार वीज खंडित होण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. गावांची वाढती लोकसंख्या, नवीन वीज जोडण्यांची संख्या आणि शेतीसाठी वाढलेली विजेची मागणी लक्षात घेता जुन्या व कमी क्षमतेच्या डीपींचे अपग्रेडेशन करणे गरजेचे आहे, असे जिल्हाध्यक्ष तनय देशकर यांनी म्हटले आहे.

महावितरणने संबंधित गावांमधील डीपींचे तातडीने सर्वेक्षण करून ज्या ठिकाणी क्षमतेपेक्षा अधिक भार आहे, त्या ठिकाणी डीपीची क्षमता वाढवावी, आवश्यकतेनुसार नवीन डीपी बसवाव्यात आणि कमी व्होल्टेजची समस्या दूर करून नागरिकांना व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# ने.हि. महाविद्यालयात राजीव गांधी जयंती



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात भारताचे माजी पंतप्रधान, विज्ञान-तंत्रज्ञानाचे पुरस्कर्ते स्व.राजीव गांधी यांची जयंती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

याप्रसंगी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया यांनी प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले. त्यानंतर कार्य.प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांनी प्रतिमेला माल्यार्पण केले व आपली आदरांजली वाहिली. उपस्थित डॉ राजेंद्र डांगे, डॉ रेखा मेश्राम, डॉ रतन मेश्राम, डॉ धनराज खानोरकर, डॉ असलम शेख, डॉ सुनिल चौधरी, डॉ मिलिंद पठाडे, डॉ योगेश ठावरी, डॉ युवराज मेश्राम, डॉ प्रकाश वट्टी, डॉ पद्माकर वानखडे, प्रा आकाश मेश्राम, डॉ दर्शना उराडे, प्रा निलिमा रंगारी, पर्यवेक्षक प्रा आनंद भोयर, अधीक्षक संगीता ठाकरे, प्रा जयेश हजारे, डॉ दलेश परशुरामकर, प्रा बावनकुळे, प्रा उके, प्रा अजय खोब्रागडे, प्रा ठोंबरे, रोशन डांगे, रुपेश चामलाटे, गोलू कोसे इत्यादी मान्यवरांनी पुष्प वाहून अभिवादन केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ युवराज मेश्रामांनी केले. यशस्वीतेसाठी समितीने सहकार्य केले.

# शिवराज मालवी यांना राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत ४ सुवर्ण



ब्रह्मपुरी/का.प्र.

स्वातंत्र्यदिनानिमित्त सोलापूर जिल्हा मास्टर्स ॲक्वॅटिक असोसिएशन, सोलापूर, अखिल भारतीय मारवाडी युवा मंच सोलापूर व अर्थक्रांती जीवन गौरव अभियान सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील मास्टर्स जलतरणपटूंसाठी भव्य राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन शनिवार दिनांक २२ ऑगस्ट २०२६ रोजी सोलापूर येथील श्री मार्कंडेय जलतरण तलाव येथे करण्यात आली होते.

या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील सुमारे ३०० जलतरणपटू सहभागी झाले होते. चंद्रपुर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करत ब्रह्मपुरी येथील सेवानिवृत्त शिक्षक शिवराज मालवी यांनी आपल्या ६० ते ६४ वयोगटात विविध जलतरण प्रकारात सहभाग नोंदवला व जिद्दीने सहभागी होत ४ सुवर्ण पदक तर १ रजत पदक प्राप्त करून पुन्हा एकदा राज्यस्तरीय स्पर्धेत नेत्रदीपक यश संपादन करीत ब्रह्मपुरीचे नाव राज्यस्तरावर रोशन केले.

शिवराज मालवी यांनी या राज्यस्तरीय स्पर्धेत ५० मीटर फ्रिस्टाईल, ५० मीटर बॅकस्ट्रोक, ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक,व १०० मीटर बॅकस्ट्रोक मध्ये सुवर्ण पदक तर १०० मीटर फ्रिस्टाईल मध्ये रजत पदक प्राप्त केले. त्यांच्या या यशाबद्दल त्यांची सर्वत्र प्रशंसा केली जात असून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# कहाली येथे विद्यार्थ्यांना नोटबुकचे वितरण

ब्रम्हपुरी/का.प्र.

कहाली /खंडाळा येथील जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी नोटबुक वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजय वडेट्टीवार यांच्या वतीने तसेच सुधीरभाऊ शिवरकर अध्यक्ष विमुक्त जाती भटक्या जमाती तालुका ब्रम्हपुरी व नेताजी मेश्राम माजी सभापती पंचायत समिती ब्रम्हपुरी यांच्या मार्फत शाळेतील विद्यार्थ्यांना नोटबुकचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाली असून, विद्यार्थ्यांमध्येही मोठा उत्साह पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांनी आनंदाने नोटबुक स्वीकारत कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमास अर्चना डेंगे सरपंच खंडाळा, अरुण अलोने, नंदकिशोर राखडे उपसरपंच खंडाळा, राजू नान्हे, दिनेश नाकाडे, विलास दिघोरे, अश्विनी राऊत सरपंच कहाली व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य किसान सभेचा शेतकरी निर्धार मेळावा

## ०८ सप्टेंबरला 'दे धडक बैलगाडी-ट्रॅक्टर मोर्चा' तर ०१ सप्टेंबरला 'चलो दिल्ली'ची हाक

ब्रह्मपुरी/का.प्र.

शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या आणि विविध ज्वलंत समस्यांवर आवाज उठवण्यासाठी महाराष्ट्र राज्य किसान सभा, शाखा ब्रह्मपूरीच्या वतीने २२ ऑगस्ट २०२६ रोजी गांगलवाडी येथील ग्रामपंचायत सभागृहात 'शेतकऱ्यांचा निर्धार मेळावा' मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा होऊन आगामी आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली.

मेळाव्याला प्रमुख मार्गदर्शक म्हणून अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय कार्यकारी सदस्य तथा महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष डॉ. महेश कोपुलवार, भाकपचे आरमोरी येथील माजी नगरसेवक ॲड. जगदीश मेश्राम आणि चंद्रपूर किसान सभेचे जिल्हा सचिव विनोद झोडगे पाटील उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या भाषणातून शेतकरीविरोधी धोरणांवर सडकून टीका करत हक्कासाठी रस्त्यावर उतरण्याचे आवाहन केले.

प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी येत्या ८ सप्टेंबर रोजी ब्रह्मपुरी उपविभागीय कार्यालयावर भव्य 'दे धडक बैलगाडी व ट्रॅक्टर मोर्चा' काढण्याचा निर्धार या वेळी करण्यात आला. तसेच भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने १ सप्टेंबर रोजी संसदेवर धडकणाऱ्या 'बदलाव जरूरी है! चलो दिल्ली' या आक्रोश मोर्चातही मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन कॉ. विनोद झोडगे पाटील यांनी केले. या मेळाव्याला सुनील शेंडे, मधुकर चौधरी, सुनील म्हशाखेत्री, ईश्वर ठाकरे, अमोल मानापुरे, लोमेश मेश्राम, प्रमोद सातपुते, विनोद पाटील, राजेश्वर मगरे, गोलू दर्वे, चुनीलाल मोटघरे, प्रशांत खोब्रागडे, आनंदराव भोयर, यश नंदनवार यासह गांगलवाडी, मुडझा, मेंडकी, निलज परिसरातील शेकडो शेतकरी, शेतमजूर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

✽✽✽✽✽✽

# ग्रंथालयाचे उद्घाटन व नोटबुकचे वितरण संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करता यावी म्हणून बाल वयापासुन मनात वाचनाची आवड निर्माण व्हावी व उत्तम विद्यार्थी घडावेत यासाठी केंद्रप्रमुख गावतुरे, मुख्याध्यापक गोन्नाडे व शिक्षकवृंद यांच्या संकल्पनेतून विद्यालयामध्ये ग्रंथालयाचे उद्घाटन वामनभाऊ मिसार यांनी केले.

विद्यार्थ्यांना वाचता वाचता लिहिण्याची सवय व्हावी, लिहिता लिहिता अक्षर सुंदर, वळणदार व्हावेत हा दूरदृष्टीकोण ठेवून ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांचेकडून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अऱ्हेनवरगांव येथील विद्यार्थ्यांना नोटबुक भेट देण्यात आले. काँग्रेस कार्यकर्ते वामन मिसार, विनोद बुल्ले, सुधीर शिवरकर, केंद्रप्रमुख गावतुरे, मुख्याध्यापक गोन्नाडे, संजय जराते यांनी विद्यालयातील पटांगणात घेण्यात आलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना नोटबुकचे वितरण केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक शिक्षिका यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन शिक्षक मून तर आभार प्रदर्शन पाथोडे यांनी केले.

जल है तो कल है...

# अड्याळ-चोरटी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरू

## आमदार विजय वडेट्टीवार यांच्या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी



ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील अड्याळ-भगवानपूर चोरटी रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिक व वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून खड्डे बुजविण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांच्याकडे केली होती.

नागरिकांच्या मागणीची तातडीने दखल घेत विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला आवश्यक निर्देश देऊन अड्याळ-भगवानपूर चोरटी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना केल्या. आमदारांच्या निर्देशानंतर संबंधित विभागाकडून रस्त्याच्या दुरुस्तीचे काम प्रत्यक्षात सुरू करण्यात आले आहे. पावसाळ्यामुळे या मार्गावर खड्ड्यांची संख्या वाढली होती. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते, तसेच अपघाताची शक्यताही निर्माण झाली होती. नागरिकांनी ही समस्या आमदार वडेट्टीवार यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने प्रशासनाशी संपर्क साधून रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे निर्देश दिले.

नागरिकांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत अल्पावधीतच दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे. नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या तातडीने मार्गी लावण्यासाठी आमदार विजय वडेट्टीवार यांचे सदर परिसरातील नागरिकांनी आभार व्यक्त केले आहे.

●●●●●●●




# महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

निकालाची टक्केवारी ९९.३३

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील बेटाळा येथील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथील बी.फार्म अंतिम







वर्षाच्या विद्यार्थ्यांनी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या उन्हाळी २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालाची आपली यशस्वी परंपरा यंदाही कायम राखत ९९.३३ टक्के निकाल नोंदविला आहे.

या निकालात बी.फार्म अंतिम वर्षातील अनिकेत लुटे व प्रशांत शिवणकर यांनी ८.५१ सीजीपीए प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळविला. तर कु. चैत्रवी कोहळे हिने ८.२९ सीजीपीए मिळवत द्वितीय, व कु. कामाक्षी किरपाल हिने ८.२३ सीजीपीए मिळवत तृतीय क्रमांक पटकाविला.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे महाविद्यालयातील अनुभवी, उच्चशिक्षित व कुशल प्राध्यापकांचे मार्गदर्शन, तसेच संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या विविध शैक्षणिक सुविधा, संसाधने व सोयी यांचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले. दरम्यान, महाविद्यालयात शैक्षणिक सत्र २०२६-२७ ला सुरुवात झाली असून डी.फार्म, बी.फार्म, एम.फार्म आणि पी.जी.एम.एल.टी. या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेलाही प्रारंभ झाला आहे.

✽✽✽✽✽✽

### ... QUOTES ...

"The best brains of the nation may be found on the last bench of the classroom."
- Dr. APJ Abdul Kalam

### चा रो ळी

दुर्बल-आळशी मनात
शक्तिशाली विचार कसे येणार...
आजीबाईच्या बटव्यात,
'एड्स'चे औषध कसे मिळणार...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# ०५ वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला २० वर्षाचा कारावास

ब्रह्मपुरी/का.प्र.

पाच वर्षांच्या लहान बालिकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधमाला चंद्रपूर सत्र न्यायालयाने २० वर्षांच्या सश्रम कारावासाची आणि ५ हजार रुपये दंडाची कडक शिक्षा सुनावली आहे. अवघ्या दोन वर्षांत न्यायालयाने हा निकाल देऊन पीडित चिमुकलीला आणि तिच्या कुटुंबाला अखेर न्याय मिळवून दिला.

ही धक्कादायक घटना २७ ऑगस्ट २०२२ घडली होती. ब्रह्मपुरी तालुक्यातील बांद्रा येथील गुरुकुंज आश्रम देवस्थान परिसरात सकाळी १० ते ११ वाजेच्या सुमारास ही चिमुकली खेळत होती. त्याच वेळी गावातीलच युवराज बळीराम मेश्राम (वय ३०) याने संधी साधून तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. बालिका वेदनेने जोरात ओरडली. तिचा आवाज ऐकून तिच्या घरातील लोक धावत आले. ते येताच आरोपी युवराज तिथून पळून गेला. या घटनेनंतर कुटुंबीयांनी थेट ब्रह्मपुरी पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार नोंदवली. पोलिसांनी त्वरित गुन्हा नोंदवला (अपराध क्र. ४३७/२०२२) आणि आरोपीला बेड्या ठोकल्या.

महिला पोलीस उपनिरीक्षक स्वाती फुलेकर यांनी या प्रकरणाचा अत्यंत सखोल आणि संवेदनशीलतेने तपास केला. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अहवाल आणि इतर भक्कम परिस्थितीजन्य पुरावे गोळा करून वेळेत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. हा खटला चंद्रपूरचे जिल्हा व सत्र न्यायाधीश पी. एम. गुप्ता यांच्या न्यायालयात चालला. सरकारी पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता ॲड. सुधाकर डेगावार यांनी बाजू मांडली. सर्व पुरावे विचारात घेऊन न्यायालयाने आरोपी युवराज मेश्राम याला पोक्सो कायद्याच्या कलम ६ अन्वये २० वर्षे सश्रम कारावास आणि ५,००० रुपये दंड अशी कडक शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास १ महिना अतिरिक्त साधा कारावास भोगावा लागेल. तसेच दंडाची संपूर्ण ५,००० रुपयांची रक्कम पीडित बालिकेला नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

या खटल्यात कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून ब्रह्मपुरी पोलीस ठाण्याचे अंमलदार प्रकाश नागोराव शेंदरे यांनी काम पाहिले. चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी ब्रह्मपुरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही संपूर्ण कारवाई पार पडली.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.


## ब्रम्हपुरी नगर परिषदेच्या टेंडर...

(पान क्र. १ वरून)

प्रकरणाच्या चौकशीचे निर्देश दिले आहेत, तेव्हा संपूर्ण अहवाल बाहेर येणे गरजेचे होते. चौकशी पूर्ण होण्याआधीच घाईघाईत नव्याने निविदा काढण्यामागे प्रशासनाचा काय हेतू आहे, हे त्यांनी आधी जनतेला स्पष्ट करावे.' त्यांनी पुढे ठामपणे सांगितले की, 'जनतेच्या करातून विकासकामे होतात. त्यात पूर्ण पारदर्शकता असायलाच हवी. एखाद्या ठराविक ठेकेदाराचे भले करण्यासाठी हा सगळा घाट घातला गेलाय का? निविदा प्रसिद्धीपासून ते नवीन टेंडर काढण्यापर्यंतच्या प्रत्येक निर्णयाची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे.'

नगर परिषदेच्या अशा संशयास्पद कारभारामुळे ब्रह्मपुरीकरांमध्ये मोठी चर्चा रंगली आहे. आता मुख्याधिकारी जिल्हाधिकाऱ्यांकडे नेमका काय अहवाल सादर करतात आणि या चौकशीतून काय सत्य बाहेर येते, याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. भविष्यात नगर परिषदेतील सर्व विभागांच्या निविदा या नियमानुसार आणि पूर्ण पारदर्शक पद्धतीनेच झाल्या पाहिजेत, अशी ठाम मागणी आता जोर धरू लागली आहे.

# मुलींकरीता सहानुभूतीसह रोजगार क्षमता कार्यशाळा

## महाराष्ट्र इंस्टिट्युट ऑफ फार्मसी बेटाळा महाविद्यालयाचा उपक्रम




ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेटाला, ब्रम्हपुरी महाविद्यालयात दि. १७.८.२०२६ पासून प्रत्येक दिवशी दोन तासाच्या दोन बॅचेस या प्रमाणे दि.२४.८.२०२६ पर्यंत चौदा सत्रामध्ये ही कार्यशाळा नंदी फाउंडेशन तर्फे आयोजित करण्यात आली.

या सत्रांमध्ये मी अद्वितीय आहे, देहबोली आणि व्यावसायिक सौंदर्य, करिअर साठी इंग्रजी भाषा, बोलण्याची कला, ध्येय निर्धार आणि वेळेचे व्यवस्थापन, नोकरीच्या संधी, मुलाखातीची पूर्वतयारी, व्यावसायिक संप्रेषण, गट चर्चेला चालना, व्यावसायिक नैतिकता, गूढ विचार करणे, प्रकल्प सादरीकरण, गट सादरीकरण, डिजिटली ओळखा, बोलण्याची कला व मूल्यांकन, समस्या निवारण, अर्थ व्यवस्थापन इत्यादी विषयांवर प्रशिक्षक देवेंद्रजी पिलानी आणि वसंतजी मंडाये यांनी उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा सुव्यवस्थित पणे संपन्न व्हावी यासाठी सर्व प्राध्यापक गण व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या तसेच महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट ऑफिसर प्रा.कु. पूजा घुटके तसेच प्रा.कु. विजया सोनवणे यांच्या सहकार्याने सहभाग घेणाऱ्या विद्यार्थिनींना कळविण्यात आले होते. या सात दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन दुधे, रा.से.यो. अधिकारी प्रा. श्रीकांत महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. कार्यशाळेचे समारोप २४.८.२०२६ रोजी प्रो.डॉ. सुहास साकरकर तसेच रा.से.यो. अधिकारी प्रा. श्रीकांत महाजन यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळेस सात दिवसीय कार्यशाळेचे प्रशिक्षण प्राप्त केलेल्या विद्यार्थिनींचे अनुभव कथन घेण्यात तेव्हा त्यांच्यामध्ये दृढ विश्वास, निसंकोच पणे कोणत्याही प्रसंगावर मात करण्याची कला त्यांनीअवगत कल्याचे आढळून आले. कार्यशाळेचे संचालन प्रा.कु. विजया सोनवणे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन डी.फ़ार्म द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु.चंदा वाटगुले हिने केले. कार्यशाळा उत्कृष्टपणे यशस्वी केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष देवेंद्रजी पिसे आणि प्राचार्य डॉ. सचिन दुधे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

## पेठवार्डातील एकाला भरमार...

(पान क्र. १ वरून)

रीतसर जप्ती पंचनामा करून सुमारे १४१ सेमी लांबीची ही बंदूक जप्त केली.

या प्रकरणी आरोपी रतनसिंग मैताबसिंग भुरानी (वय ५६, व्यवसाय-मजुरी, रा. आरमोरी रोड, पेठवार्ड, ब्रम्हपुरी) याच्याविरोधात भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला आणि जप्त मुद्देमालाला पुढील कारवाईसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. ब्रम्हपुरी पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.


ब्रम्हपुरी समाचारच्या अंककरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315



बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404